# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९६-२२** **दिनांक :- ३१/०३/२०२२**

## पालघर जिल्हयात एअरटेल टॉवर मधुन 4G नेटवर्क करीता वापरण्यात येणा-या AB, BTS व VIL कार्डची चोरी करणारी टोळी गजाआड- जिल्ह्यातील एकुण ०५ गुन्ह्यांची उकल करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक १६/०३/२०२२ रोजी वालीव पोलीस ठाणे हद्दीत एअरटेल मोबाईल टॉवर मधुन **4G** नेटवर्क करीता वापरण्यात येणारे **AB** कार्ड चोरी झाले बाबत फिर्यादी महेंद्र आबा पष्टे, रा. मु. आबोडे ता. वसई जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन अज्ञात आरोपींविरुद्ध गु.र.नं २९५/२०२२ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना घटनास्थळावर मिळालेल्या तांत्रिक गोष्टींचा अभ्यास केला असता लाल रंगाची मॅकव्हील असलेली स्पोर्टस बाईक त्यावर दोन संशयीत इसम घटनास्थळावर वावरताना दिसुन आले. त्याआधारे सदर मोटर-सायकलचा मागोवा काढुन अधिक माहिती घेतली असता सदर मोटर सायकल वापरत असलेल्या संशईतांचे नावे समजुन आले. त्याआधारे आरोपी १) अर्जुन मुलचंद यादव, रा. वसई पुर्व, २) अनिस हनिफ मलिक, रा. मुंबई ३) रामसुरत शेषराम वर्मा, रा. मुंबई ४) रामजनम राजेंद्रप्रसाद यादव, रा. वसई पुर्व यांना त्याचे राहते घरापासुन काही अंतरावर सापळा लावुन ताब्यात घेण्यात आले असता प्राथमिक चौकशी दरम्यान त्यांनी सदरचा व इतर गुन्हे केल्याची प्राथमिक माहिती दिली. आरोपीतांनी वालीव, पेल्हार, डाहणु, सफाळा, मनोर पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील गुन्हे केल्याचे कबुली दिल्याने गुन्ह्यातील चोरीस गेलेले **AB, BTS व VIL** कार्ड असे एकुण १२ कार्ड हस्तगत करुन खालील गुन्हे उघड करण्यात यश आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक | कलम |
|---|---|---|---|
| १ | वालीव | I ०५/२०२२ | भादविस-कलम ३७९, ४११, ३४ |
| २ | पेल्हार | I २७९/२०२२ | भादविस-कलम ३७९ |
| ३ | डहाणु | I ३४/२०२२ | भादविस-कलम ३७९ |
| ४ | सफाळा | I २७/२०२२ | भादविस-कलम ३७९ |
| ५ | मनोर | I ९८/२०२२ | भादविस-कलम ३७९ |

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, पोना.सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.